# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण २२, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने, मंत्री**<br>**(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री**<br>**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६९**

---

### राज्यात राष्ट्रीय नागरी आरोग्य मिशन योजनेसाठी केंद्र शासनाने दिलेल्या निधीत झालेला गैरव्यवहार

**(१) * २५७८५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय नागरी आरोग्य मिशन (एनयूएचएम) योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.१३४/२०१६ च्या संबंधात वर्तमानपत्रात या संबंधी बातम्या प्रसिध्द झाल्याची बाब खरी आहे.

(२) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या ग्रामीण भागात १८ ठिकाणी कर्करोग निगा केंद्रे स्थापन करण्याच्या घोषणेबाबत**

**(२) * २५८४४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण भागात १८ ठिकाणी कर्करोग निगा केंद्रे स्थापन करण्याची घोषणा कोकिलाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालयाने मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणत्या ग्रामीण भागाची निवड केली आहे व किती कालावधीत सुरु करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय

(२) शासनाने अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, चंद्रपूर, गोंदिया, जळगाव, कोल्हापूर, लातूर, नंदुरबार, नांदेड, नाशिक, परभणी, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, यवतमाळ या १८ जिल्ह्यांची निवड केली असून यापैकी गोंदिया, अकोला आणि सोलापूर येथे प्राथमिक काम सुरु करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हा परिषदेंतर्गत अंगणवाडी साहित्य खरेदीत बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(३) * २५२२३ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा परिषदेंतर्गत अंगणवाडीकरीता साहित्य पुरवठ्यासाठी ४४ लाख ५५ हजार रुपये निधी प्राप्त होवून काही तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी सेविकांच्या खात्यात रक्कम न देता खरेदीमध्ये गैरव्यवहार केल्याचे दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही,

आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे कार्यालयाकडून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अंगणवाडीला साहित्य खरेदीकरिता प्रती अंगणवाडी रुपये ५०००/- प्रमाणे एकूण रुपये ४४,९५,०००/- इतका निधी प्राप्त झाला होता. सदर सर्व निधी संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून त्या-त्या प्रकल्पांच्या अंगणवाडी सेविकांच्या खात्यामध्ये तसेच काही अंगणवाडी सेविकांना रोखीने अदा करण्यात आला होता. सदर रक्कम प्राप्त झाल्याच्या अंगणवाडी सेविकांच्या स्वाक्षरीसह पावत्या घेण्यात आलेल्या आहेत. साहित्याची खरेदी (कपाट व खुर्ची) ही अंगणवाडी सेविकामार्फत करण्यात आलेली आहे. सदर खरेदी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी केलेली नाही.

(२) व (३) साहित्य खरेदीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, भंडारा स्तरावर चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) तालुका कृषि कार्यालयात पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत निधीत अपहार झाल्याबाबत

**(४) * २६२१४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुका कृषि कार्यालयांतर्गत मौजे हिमायतनगर, जळगाव मंडळ मधील पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम जलयुक्त शिवार अभियान, जिल्हा नियोजन समिती या योजनामध्ये चालू आर्थिक वर्षामध्ये तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व कृषि पर्यवेक्षकांनी ठेकेदारांशी संगनमत करून बोगस कामे करून शासनाच्या निधीचा अपहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोगस कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे निवेदन दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.कृषि मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बोगस कामे करून निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.सतिश बोन्तावार यांनी दिनांक १०/८/२०१६ रोजी संचालक, मृदसंधारण, पुणे यांच्याकडे तक्रार केलेली आहे.

(३) उपविभागीय कृषि अधिकारी, किनवट यांनी प्रस्तुत प्रकरणी कामांची तपासणी केलेली असून तपासणीमध्ये कामात त्रुटी आढळून आल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयात डेंग्यू आजाराचा प्रादुर्भाव वाढल्याबाबत

**(५) * २६४४१ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात डेंग्यू आजाराचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव वाढला असून शिरपूर शहरात दोन शाळकरी मुलांचा डेंग्यूमुळे मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या मृत विद्यार्थ्यांच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत व डेंग्यू या जीवघेण्या आजारावर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

धुळे जिल्ह्यात सन २०१६ मध्ये सप्टेंबर अखेर डेंग्यू आजाराचे १५४ रुग्ण आढळले होते. शिरपुर शहरात माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये दोन शाळकरी मुलांचा मृत्यू झाला आहे, विभागीय मृत्यू संशोधन समितीच्या अहवालानुसार एका मुलाचा मृत्यू संशयित डेंग्यू आजाराने झाला असून दुसऱ्याचा मृत्यू विषाणूजन्य तापाने झाला आहे.
(२) साथरोग उद्रेकात मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णाच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याविषयी कोणतीही शासकीय योजना नाही.

धुळे जिल्ह्यात व शिरपूर शहरात किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यू आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषित मुलांच्या सर्वेक्षणाबाबत

**(६) * २४४१० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कुपोषित मुलांचे प्रमाण कमी होत असल्याचे शासनाने जाहिर केले असले तरी चौथ्या राष्ट्रीय कुटुंब कल्याण यांच्या सर्वेक्षणातून सदर दावा अयशस्वी ठरल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात पाच वर्षाखालील सुमारे ३६ टक्के मुलांचे वजन व उंची आरोग्य निर्देशांकापेक्षा कमी असल्याचे सदर सर्वेक्षणात नमूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्वेक्षणानुसार कुपोषण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) चौथ्या राष्ट्रीय कुटुंब कल्याण सर्वेक्षणातून ० ते ५ वर्षातील ३६ टक्के कमी वजनाची दर्शविण्यात आलेली आहेत.

(२) होय.

(३) कुपोषण कमी करण्यासाठी शासनामार्फत नियमितपणे खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्यातील ०-६ वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना १) पुरक पोषण आहार २) आरोग्य तपासणी ३) संदर्भ सेवा ४) अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण ५) लसीकरण ६) आहार व आरोग्य इ.६ (सहा) सेवा नियमित देण्यात ये आहेत.

२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची बालके, तसेच किशोरवयीन मुली यांना घरपोच आहार (THR) व ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थींना गरम ताजा आहाराचा पुरवठा स्थानिक स्वयंसहाय्यता महिला बचतगट/महिला मंडळ, तसेच महिला संस्थांमार्फत करण्यात येत आहे.

३) आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकलपातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषण मुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो.

४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो.

५) अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत अंगणवाडीमध्ये गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळचा चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना दिनांक १ डिसेंबर, २०१५ पासून राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-------------------------------

## राज्यासह मुंबईतील स्वाईन फ्ल्यूचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठी प्रयोगशाळांची संख्या वाढविण्याबाबत

**(७) * २६५१४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वाईन फ्ल्यूची चाचणी करण्यासाठी पुरेशा प्रयोगशाळा नाहीत. मुंबईत एकच प्रयोगशाळा असल्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार करणे शक्य होत नसल्याने रुग्णांचे प्राण धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षापूर्वी राज्यात स्वाईन फ्ल्यूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे २१५ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यासह मुंबई शहरातील स्वाईन फ्ल्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रयोगशाळांची संख्या वाढविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

स्वाईन फ्ल्यू आजारावरील उपचार हे भारत सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार लक्षणांच्या वर्गीकरणानुसार करण्यात येतात. त्यामुळे प्रयोगशालेय निदानासाठी उपचारास विलंब होत नसल्याने निदानाअभावी रुग्णाचे प्राण धोक्यात येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मुंबई येथे कस्तुरबा रुग्णालय आणि हाफकिन संशोधन संस्था या शासकीय संस्थांमध्ये स्वाईन फ्ल्यू निदानाचे मोफत व्यवस्था उपलब्ध असून या प्रयोगशाळांशिवाय काही खाजगी प्रयोगशाळांनाही स्वाईन फ्ल्यू निदानाची परवानगी देण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

दोन वर्षापूर्वी म्हणजे सन २०१४ मध्ये राज्यात स्वाईन फ्ल्यूचे ११५ रुग्ण आढळले असून त्यापैकी ४३ रुग्णांचा मृत्यू झाला होता.
(३) प्रयोगशाळा निदानामुळे रुग्णांस उपचार सुरु होण्यास विलंब होत नसला तरी मुंबईसह राज्यात अधिकाधिक स्वाईन फ्ल्यू निदानाची सुविधा असणाऱ्या प्रयोगशाळा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे. सुरुवातीला केवळ राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथे ही सुविधा उपलब्ध होती, परंतु आता सार्वजनिक क्षेत्रातील हाफकिन संस्था, कस्तुरबा रुग्णालय मुंबई आणि इंदिरा गांधी स्मृती महाविद्यालय नागपूर येथेही ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

खाजगी क्षेत्रातील प्रयोगशाळांना स्वाईन फ्ल्यू निदानाची परवानगी देण्याकरीता मुंबई, नागपूर व उर्वरित राज्याकरिता ३ तज्ञ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. खाजगी क्षेत्रातील ९ प्रयोगशाळांनाही ही मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावरगाव (ता.नांदगाव, जि.नाशिक) जिल्हा प्राथमिक शाळेत शिक्षकाने मद्यपान केल्याबाबत

**(८) * २५८४५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील जिल्हा प्राथमिक शाळेत एका शिक्षकाने ७ वीच्या वर्गात मद्यपान केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे संतप्त झालेल्या पालकांनी अधिकारी जोवर प्रत्यक्ष पहाणी करीत नाहीत तो वर्ग बंद ठेवण्याचा पवित्रा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय

(२) हे खरे नाही.

(३) व (४) विस्तार अधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार संबंधित शिक्षकास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या दिनांक २ डिसेंबर, २०१६ च्या पत्रान्वये निलंबित करण्यात आले असून खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

-----------------

## वाल्हीवरे (ता. मुरबाड, जि.ठाणे) गावातील मजूरांना केलेल्या कामाचा मोबदला देण्याबाबत

**(९) * २४४२४ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुका कृषी विभागांतर्गत वाल्हीवरे गावात पाणी अडवा योजना राबवून माहे मे, २०१६ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात आलेल्या १९७ दगडी बंधाऱ्याचे काम पूर्ण केलेल्या वाल्हीवरे गावातील २२ महिला व ४६ पुरुष अशा एकूण ६८ मजूरांना कामाचा मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे ऑनलाईन टेंडर पध्दतीने कृषी विभागाने ठराविक ठेकेदारांना मॅनेज पध्दतीने दिली असून ठेकेदार सातारा येथील काटकर कन्स्ट्रक्शन कंपनीचे असून सदरहू कामांवर वाल्हीवरे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील मजूरांनी कृषी खात्यांच्या अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवून उन्हातान्हात राबून बंधाऱ्याची कामे पूर्ण केली असता कृषी विभागाने काटकर कन्स्ट्रक्शन एजन्सीला मंजूराच्या कामाचा मोबदल्याच्या देयकाचा धनादेश दिला असूनही सदरहू मजूराना मजूरी न मिळाल्याने त्याची फसवणूक झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून मजूरांची फसवणूक झाल्याप्रकरणी संबंधित अधिकारी तसेच ठेकेदारांवर जबाबदारी निश्चित करुन संबंधित मजूरांना त्यांच्या मजूरीची रक्कम अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

वाल्हीवरे गावात पाणी अडवा योजनांतर्गत १२ अनघड दगडी बांध गटाची कामे करण्यात आली आहेत. त्यामध्ये ११७ बांधांचा समावेश होता. सदर कामे ठेकेदार, मे.काटकर कन्स्ट्रक्शन यांचा निविदा पध्दतीने देण्यात आली होती. शासनाद्वारे झालेल्या कामांची रक्कम ठेकेदारांना रुपये २८९४९२/- व ९८७०४/- या दोन धनादेशाद्वारे अदा करण्यात आली होती. तथापि ठेकेदाराने काम करुनही बराच काळ स्थानिक मजूरांची मजूरी अदा केली नाही. त्यामुळे मजूरांनी दिनांक १३/७/२०१६ रोजी तालुका कृषि अधिकारी, मुरबाड यांचेकडे तक्रार सादर केली होती.

याबाबत तालुका कृषि अधिकारी, मुरबाड यांनी सदर ठेकेदाराशी संपर्क साधून रक्कम अदा करणेबाबत कळविले. त्यानंतर संबंधित मजूरांची मजूरी ठेकेदाराद्वारे अदा करण्यात आली.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात कॅन्सर इन्स्टिट्यूट उभारण्याबाबत

**(१०) * २५२९१ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्यामुळे कॅन्सर इन्स्टिट्यूट उभारण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहराचे कॅन्सर इन्स्टिटयूट हे औरंगाबाद येथे सुरू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर शहरात कॅन्सर इन्स्टिट्यूट उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) औरंगाबाद येथे राज्यस्तरीय कर्करोग संस्था स्थापन करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.
(३) नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या उपलब्ध सुविधेचे सक्षमीकरण तसेच कर्करोग उपचाराच्या आधुनिक सुविधा निर्माण करावयाच्या दृष्टीकोणातून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांना देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामीण भागातील व आदिवासी समाजातील कुपोषण कमी करण्यासाठी बंद असलेल्या बालविकास केंद्रांना निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(११) * २३९७५ श्री.नारायण राणे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील तसेच आदिवासी समाजातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्यात बालविकास केंद्रे सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र निधीअभावी अनेक जिल्ह्यात ही केंद्रेच सुरू झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही ग्रामीण भागात सुरु केलेली बालविकास केंद्रे निधी अभावी सुमारे तीन महिन्यांपासून बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यंदाच्या अर्थसंकल्पात केलेली तरतूद गतवर्षीच्या तुलनेत ६२ टक्क्यांनी घटली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन निधी उपलब्ध करून देऊन बालविकास केंद्रे सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) केंद्र शासनाच्या निधीतून राज्यात ग्राम बालविकास केंद्र (VCDC) योजना आरोग्य विभागाकडून सुरु होती. यासाठी केंद्राकडून मिळणारा निधी बंद झाल्याने सदरची योजना राज्यात बंद करण्यात आली होती. त्याअनुषंगाने आदिवासी क्षेत्रातील लहान बालकांच्या कुपोषणावर प्रभावीपणे मात

करण्यासाठी महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.४३/(भाग-१ ब)/का.५, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये राज्यात आदिवासी क्षेत्रात ग्राम बालविकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच राज्यातील ग्रामीण भागात ग्राम बालविकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) बालविकास केंद्रासाठी (VCDC) केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत कोणत्याही प्रकारची तरतूद देण्यात येत नाही. केंद्र शासनाकडून नियमित पोषण आहारासाठी तरतूद देण्यात येते. बालविकास केंद्र (VCDC) ही संपूर्णपणे राज्य शासनाची योजना आहे.

सन २०१५-१६ मध्ये नियमित पोषण आहारासाठी रुपये १३५०/- कोटी तरतूद प्राप्त झाली होती. गतवर्षी माहे ऑक्टोबर, २०१६ पर्यंत रुपये ८९०/- कोटी तरतूद प्राप्त झालेली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत गत वर्षी ३५% तरतूद कमी प्राप्त झालेली आहे.

(४) राज्यातील आदिवासी क्षेत्रात ग्राम बालविकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित रुपये १७.११ कोटी एवढी रक्कम प्रदान करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील ग्रामीण भागात ग्राम बालविकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**नंदुरबार जिल्हयातील कुपोषित बालकांचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(१२) * २४०४१ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हयातील ९ हजार बालके कुपोषित असल्याचे सर्वेक्षणातून माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हाधिकारी, नंदूरबार यांनी जिल्हयात नव्याने सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार सर्वेक्षणाअंती काय आढळून आले, तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता केंद्र शासन व राज्य शासन यांनी विविध योजना राबवूनही कुपोषणाचे प्रमाण कमी होत नाही याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नंदुरबार जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१६ च्या मासिक प्रगती अहवालानुसार ० ते ५ वर्ष वयोगटातील सर्वेक्षित बालके एकूण १४४४१७ पैकी १३६८५२ बालकांचे वजन घेण्यात आलेले आहेत.

वजन मापन क्षमतेनुसार

| | |
|---|---|
| साधारण श्रेणी - | ९४९७०, |
| मध्यम कमी वजनाचे (MUW) - | ३३४९३, |
| तीव्र कमी वजनाचे (SUW) - | ८३८९ बालके आहेत. |

तसेच अहवाल महिन्यात SAM- १११४ व MAM-४९०४ बालके आहेत.

(२) होय.

(३) व (४) नंदुरबार जिल्ह्यात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१) माहे ऑगस्ट, २०१४ पासून गांव पातळीवर तीव्र कुपोषित बालकांचे व्यवस्थापन (C-MAM) करणेसाठी राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण मिशन, TATA Trust मुंबई, युनिसेफ व महिला व बाल कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्‌यमाने C-MAM Project राबविणेत येत आहेत त्यात कुपोषित बालकांना MNT, SF, अमालेजयुक्त आहार या स्वरुपात आहार दिले जात आहे व उपचार दिले जात आहे.

२) जिल्ह्यात भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-१ मध्ये गरोदर व स्तनदा माता यांना एकवेळ चौरस आहार देण्यात येतो व टप्पा-२ मध्ये ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/केळी देण्यात येत आहे.

३) अंगणवाडी केंद्रामध्ये ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

४) अंगणवाडी केंद्रामध्ये ६ म.ते ३ वर्ष वयोगटातील बालके, कमी वजनाची व तीव्र कमी वजनाची बालके यांना घरपोच आहार (THR) देण्यात येतो. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी होणेस मदत होत आहे.

-----------------

**पालघर जिल्ह्यात अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती नसल्याबाबत**

**(१३) * २४३०१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील बालमृत्यू व कुपोषण वाढत असताना शासनाच्या उदासीनतेमुळे सुमारे १,४१२ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्तनदा माता, गरोदर माता, ० ते ६ वयोगटातील बालके, या सर्वांसाठी बालविकास प्रकल्प कार्यालयांतर्गत कुपोषण रोखणे, उपचारासाठी पाठविणे, सकस आहार देणे या जबाबदाऱ्याही अंगणवाड्यांवर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात दिड वर्षात ८५३ बालकांचा कुपोषणाने मृत्यू होऊन कुपोषित बालके ७,३२० गरोदर माता १३,४३२, स्तनदा माता १७,४३२ आणि १,०३,०६५ किशोरवयीन मुलींची नोंद असताना यांचेसाठी अंगणवाड्यांची काहीच सोय नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत या अंगणवाड्या घर, शाळा, समाजमंदिर आदि ठिकाणी भरविण्यात येत असल्याने कुपोषण कमी करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात नाहीत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या अंगणवाड्या त्वरीत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) पालघर जिल्ह्यातील एकूण ३१८३ मंजूर अंगणवाडी केंद्रांपैकी १४१२ केंद्रांना स्वत:ची इमारत नसल्याने ती खाजगी जागेत, प्राथमिक शाळेत, समाजमंदिरे व अन्य ठिकाणी भरत आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर एकूण १२,०६७ गरोदर माता, १२,१८८ स्तनदा माता व ७५७९ किशोरवयीन मुलींना अंगणवाडी केंद्रामार्फत लाभ देण्यात आलेला असून १४०२ सॅम व ६२६५ मॅम अशी एकूण ७६६७ बालके आढळून आलेली आहेत. स्वत:ची इमारत नसलेल्या अंगणवाड्यांमधून देखील कुपोषण कमी करण्यासाठी सर्व सेवा पुरविण्यात येत असून सर्व योजना राबविल्या जात आहेत.

(५) स्वत:ची इमारत नसलेल्या अंगणवाड्यांसाठी, नविन इमारत बांधण्याकरीता, त्या ग्रामपंचायत क्षेत्रात जागा उपलब्ध असल्यास, जिल्हा नियोजन विकास समिती, आदिवासी उपाययोजना यामधून निधी उपलब्धतेच्या प्रमाणात इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

-----------------

**गाजीपूर (ता.अकोट, जि.अकोला) येथे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या नरनाळा वन्यजीव अभयारण्याच्या संरक्षित क्षेत्रात स्फोटकांची साठवणूक केल्याबाबत**

**(१४) * २६३४४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाजीपूर (ता.अकोट, जि.अकोला) येथे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या नरनाळा वन्यजीव अभयारण्याच्या संरक्षित क्षेत्रात स्फोटकांची साठवणूक करण्याकरिता खाजगी संस्थेने परवानगी मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभयारण्यातील संवेदनशील क्षेत्राचे नियम डावलून संरक्षित क्षेत्रात स्फोटकांची साठवणुक केल्यास वन्यप्राण्यांचे जीवन धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आली व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) गाजीपूर हे गाव मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या नरनाळा वन्यजीव अभयारण्य क्षेत्रात येत नाही. तथापि श्री. पवन कुमार शर्मा भागीदार अभय एन्टरप्राईजेस, अकोट जि. अकोला यांनी मौजा गाजीपूर येथील सर्वे क्र. ८/१ या जागेवर स्फोटकांची साठवणूक करण्याची जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे परवानगी मागितली आहे. गाजीपूर येथे स्फोटकांचा साठा करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे दृष्टीने जिल्हाधिकारी अकोला यांनी उप वनसंरक्षक, आकोट वन्यजीव विभाग, आकोट यांचे अभिप्राय मागितले आहेत.

(२) नरनाळा अभयारण्य अथवा मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या इतर संरक्षित क्षेत्रात स्फोटकांचा साठा करण्यासाठी परवानगी देण्यात आली नसल्यामुळे वन्यप्राण्याचे जीवन धोक्यात येण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्याला उजनीतील**
**पाणी माण नदीतून सोडण्याबाबत**

**(१५) * २५५६५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुका गेली तीन/चार वर्षे दुष्काळग्रस्त असून शेतकरी व ग्रामपंचायती पाणीपट्टी भरण्यास तयार असतानाही शेतकऱ्यांना मागणीनुसार उजनीतील माण नदीतून सुटणारे पाणी देण्यात शासनाने दुर्लक्ष केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार येथील शेती वाचविण्यासाठी उजनीतील पाणी माण नदीतून सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

उजनी प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये उजनी धरणातून कालव्याद्वारे माण नदीत सिंचनासाठी किंवा पिण्यासाठी पाणी सोडण्याची तरतूद नाही. तथापि दिनांक २४/९/२०१६ ते दिनांक १४/१०/२०१६ या कालावधीत पावसाळ्यात धरण व कालव्यात जादा झालेले पाणी माण नदीतील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यामध्ये सोडण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाणीटंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्यानंतर शेतीऐवजी**
**उद्योगांना पाणी देण्याबाबत**

**(१६) * २५५९५ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणीटंचाईच्या काळात उद्योगांवर कायम पाणीकपातीचे संकट येत असल्याने पिण्याच्या पाण्यानंतर शेतीऐवजी उद्योगांना पाणी देण्याची सूचना राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे
(३) असल्यास, उद्योग व शेती व्यवसायाला समन्यायी पाणीपुरवठा करण्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे,

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) व (३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ च्या कलम १६ (क) १ नुसार पाणी वापराच्या विविध प्रवर्गांकरिता पाण्याचे क्षेत्रिय वाटप (Sectoral Allocation) राज्य मंत्रीमंडळ स्तरावरुन करण्याची तरतूद आहे. या तरतूदीच्या अनुषंगाने दिनांक ८/११/२०१६ च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील पूर्ण झालेल्या, प्रगती पथावरील आणि नियोजित सिंचन प्रकल्पातील पाण्याचे पाण्यासाठी १५ टक्के, उद्योगासाठी १० टक्के व सिंचनासाठी ७५ टक्के याप्रमाणे क्षेत्रिय वाटप निर्धारीत करण्यात आले आहे. राज्य जलनितीनुसार प्रथम प्राधान्य पिण्याच्या पाण्यासाठी, दुसरे प्राधान्यक्रम सिंचनासाठी पाणी व तिसरे प्राधान्यक्रम औद्योगिक वापरासाठी पाणी असेच आहे व त्यानुसार दरवर्षी राज्यातील धरणांमध्ये उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे.

---------------------

## राज्यात (जीएसटी) लागू करण्याच्या उद्देशाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेमुळे मुंबई महानगरपालिका आर्थिक अडचणीत सापडल्याबाबत

**(१७) * २३६५२ श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेमुळे मुंबई महानगरपालिकेचा जकात तसेच अन्य महानगरपालिकांना ५० कोटींपेक्षा जास्त उलाढालींवर स्थानिक संस्था कर (एलबीटी), इंधन आणि मद्य सोडून अन्य वस्तूंवर उत्पादन शुल्क वसुली रद्द झालेल्या असून राज्यातील महानगरपालिका आर्थिक अडचणीत सापडल्यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे मुंबई महापालिकेला जीएसटीमुळे जकातीच्या माध्यमातून तब्बल सात हजार कोटींचे नुकसान होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी जारी केलेल्या उक्त अधिसूचनेचे स्वरुप काय आहे व त्यामुळे राज्यातील महापालिकेसमोर कोणते प्रश्न निर्माण झालेले आहेत,

(४) असल्यास, त्यामुळे मुंबईतील नागरीकांना मुलभूत सेवाही पुरवणे अशक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) त्यामुळे जीएसटी लागू करताना मुंबई पालिकेची स्वायत्तता अबाधित राखणाऱ्या कलमाची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही, संविधान (एकशे एक संशोधन) कायद्याच्या कलम १९ अन्वये अस्तित्वातल्या करकायद्यातील तरतुदी, संविधान संशोधन कायद्याशी सुसंगत नसतील तर त्या तरतुदी जोपर्यंत राज्यविधीमंडळ निरसित करीत नाही वा एक वर्षापर्यंत म्हणजेच १५ सप्टेंबर, २०१७ यातील जे अगोदर घडेल तो पर्यंत लागू राहतील, जकात व स्थानिक संस्थाकराचे प्राविधान निरसित झाले नसल्याने महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या वस्तूंवर दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ नंतर ही मुंबई महानगरपालिका जकात तसेच अन्य महानगरपालिका एलबीटी गोळा करु शकते.
(२) नाही, संविधान (एकशे एक संशोधन) कायद्यातील प्राविधानुसार सातव्या परिशिष्टातील राज्याच्या करविषयक अधिकाराच्या यादीतील नोंद क्र.५२ निरसित करावयाचे आली आहे. सदर नोंदी अंतर्गत महापालिकांचे प्रवेश कर/जकात जमा करण्याचे अधिकार उपरोक्त कायद्याच्या कलम १९ अन्वये जो पर्यंत राज्य शासन नोंद निरसित करीत नाही वा दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत सुरु राहतील तद्नंतर महानगरपालिकेस जकात लागू करता येणार नाही.
(३) केंद्र शासनाच्या दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ च्या अधिसुचनेनुसार संविधान (एकशे एक संशोधन) कायदा, २०१६ चे कलम १२ व्यतिरिक्त सर्व प्राविधान दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ पासून अंमलात आले आहेत. संशोधन विधेयकामध्ये राज्याच्या करविषयक यादीतील नोंद क्र.५२ निरसित करावयाचे प्रयोजन आहे. त्यासंदर्भात सदर तरतूद जोपर्यंत विधीमंडळ निरसित करीत नाही वा दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ पर्यंत महानगरपालिकेस जकात गोळी करण्याबाबत अधिकार आहेत.
(४) नाही, संविधान (एकशे एक संशोधन) कायद्याच्या कलम १८ नुसार वस्तु व सेवा कराच्या अवलंबनानंतर पाच वर्षे, राज्याच्या तसेच महानगरपालिकांच्या अपेक्षित कर वसूलीत कमतरता आल्यास केंद्र शासनामार्फत भरपाई होणार आहे. नुकसान भरपाई प्राप्त होणार असल्यामुळे महानगरपालिकांच्या आर्थिक बाबींवर तसेच मूलभूत सेवांवर परिणाम होणार नाही.

(५) जीएसटी लागू करताना मुंबई पालिकेस जकात निरसीत झाल्यामुळे होणाऱ्या महसूल हानीची प्रतिपूर्ती केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे. केंद्र शासनामार्फत प्रतिपूर्ती ची रक्कम प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनामार्फत महानगरपालिकेस सदर रक्कम देण्याची पध्दती निश्चित करण्यास येईल.

----------------

**नागपूर मध्ये आंतरराष्ट्रीय वैद्यीक विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत**

**(१८) * २६३१८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मध्ये आंतरराष्ट्रीय वैद्यीक विद्यापीठाची स्थापना पंतजली तर्फे करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठ स्थापन झाल्यावर प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षणाचे धडे देणारे आचार्य कुलम ही स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यातील स्वाइन फ्लू या आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत**

**(१९) * २४८११ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०० हून अधिक स्वाइन फ्ल्यू (एच१एन१) या आजारांने रुग्ण मृत्यू झाल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात स्वाइन फ्लू (एच१एन१) या आजाराचे वेळीच निदान होऊन रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी राज्यात केंद्र उभारण्यासाठी, रुग्णालयात संशयित रुग्णांसाठी वॉर्ड ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठी तसेच रुग्णालयात या आजाराची लस उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सन २०१६ मध्ये १ जानेवारी ते ३० सप्टेंबर, २०१६ अखेर राज्यात स्वाईन फ्ल्यू या आजारांचे ८० रुग्ण आढळले असून त्यापैकी २५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(२) स्वाईन फ्ल्यू रुग्णांच्या निदान व उपचारासाठी तसेच या आजाराने होणारे मृत्यू टाळण्यासाठी राज्यभरात पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- फ्ल्यू आजाराचे नियमित सर्वेक्षण
- फ्ल्यू सदृश रुग्णांचे स्क्रिनिंग करण्याकरीता सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये स्क्रिनिंग सेंटर्स कार्यरत
- संशयित तसेच बाधित स्वाईन फ्ल्यू रुग्णांच्या उपचारासाठी राज्यात विलगीकरण कक्षाची स्थापना
- गंभीर रुग्णांवर उपचारांसाठी व्हेंटीलेटर्सची सुविधा
- जून, २०१६ अखेर एक लाखाहून अधिक अतिजोखमीच्या व्यक्तींना इन्फ्ल्युएंझा लसीकरण.
- राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेसह राज्यातील चार शासकीय तर नऊ खाजगी प्रयोगशाळांमध्ये इन्फ्ल्युएंझा निदानाची व्यवस्था
- इन्फ्ल्युएंझा उपचारासाठी औषधे आणि इतर साधनसामुग्रीचा पुरेसा पुरवठा.
- इन्फ्ल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रणासाठी विविध माध्यमाद्वारे जनतेचे आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेची प्राथमिक केंद्र आणि उपकेंद्रांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) * २३८६४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ६७ प्राथमिक केंद्र आणि ३७८ उपकेंद्रांसाठी १४१ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून गेल्या १० वर्षांत सदर पदे न भरल्यामुळे आरोग्य यंत्रणेवर ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागात येण्यास वैद्यकीय अधिकारी उत्सुक नसल्याने व १२ डॉक्टर्स अनधिकृत गैरहजर असल्याने आरोग्य यंत्रणेची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी तत्वावर आरोग्य केंद्रामध्ये बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद आरोग्य विभागाने निधीसाठी जिल्हा नियोजनकडे पाठवला असतानाही त्याकडे जिल्हा प्रशासनाने दुर्लक्ष केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे,

जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३७८ उपकेंद्रे कार्यरत आहेत. सदर ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी गट-अ ची १३१ पदे मंजूर असून त्यापैकी १२१ पदे भरलेली व १० पदे रिक्त आहेत. भरलेल्या १२१ वैद्यकीय अधिका-यांपैकी १२ वैद्यकीय अधिकारी अनधिकृत गैरहजर आहेत.

ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत अशा ठिकाणच्या एका वैद्यकीय अधिका-यांची सेवा तात्पुरत्या स्वरुपात अन्यत्र उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून त्याच्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) रत्नागिरी जिल्ह्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये २० बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करुन त्यांचे मानधन जिल्हा परिषद सेस अनुदानामधुन अदा करण्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा व स्थायी समिती मध्ये मान्यता मिळाली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे. रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावरून करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे कुसूर आणि मौजे मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांना संपादित शेतजमिनींची नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२१) * २३७३८ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९३७८ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कुसूर (ता.येवला, जि.नाशिक) येथील संपादित जमिनींच्या वाढीव नुकसान भरपाईच्या प्रलंबित रकमा अदा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मौजे मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) येथील नांदूरमध्यमेश्वर जलद कालव्यासाठी संपादित झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनींच्या नुकसान भरपाईच्या रकमा अदा करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये केलेली मागणी शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) मौजे कुसूर येथील जमीन दरसवाडी पोहच कालव्यासाठी संपादित केलेली असून, सदरील प्रकल्प उर्ध्व गोदावरी प्रकल्पांतर्गत आहे. प्रकल्पास सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात तरतूद मंजूर नाही. मात्र सन २०१३-१४ वर्षातील रुपये ११२.१४

लक्ष निधी शिल्लक आहे. हा अखर्चित निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खर्च करण्याची परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून शासनास प्राप्त झाला आहे. प्रस्तावास महालेखापालांची सहमती घेण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे.

नांदूरमध्यमेश्वर जलद कालव्याच्या रुपये १७००.६१ लक्ष रक्कमेच्या भूसंपादनाच्या मागण्या प्रलंबित आहेत. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात नांदूरमध्यमेश्वर जलदगती कालव्यासाठी रुपये १०,०००/- इतकी तरतूद मंजूर आहे. निधी उपलब्धतेनुसार निधी वितरणाची कार्यवाही प्रथम प्राध्यान्याने करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई, नागपूर, पुणे या शहरातील मेट्रोसह इतर**
**विकास कामांकरिता घेण्यात येणारे कर्ज**

**(२२) * २३६०० श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नागपूर, पुणे या शहरातील मेट्रो सह इतर विकास कामांकरिता रुपये ५० हजार कोटीचे कर्ज घेण्यासाठी शासन हमी देण्याचा प्रस्ताव माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्याच्या वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ तीन मोठ्या शहरांच्या विकासासाठी घेतलेल्या कर्जाचा बोजा राज्यातील ग्रामीण जनतेसह सर्व राज्यावर टाकणे योग्य नसून या कर्जाचा बोजा ग्रामीण जनतेवर टाकू नये, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी अप्पर मुख्य सचिव, वित्त यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) राज्यातील विकासाचा प्रादेशिक असमतोल होऊ नये म्हणून शासन अशी कर्ज प्रकरणे करताना किंवा त्यांना हमी देताना याबाबत नियम वा धोरण ठरविणार आहे काय,

(५) सन २०१५ नंतर राज्य शासनाने कोणकोणत्या कारणासाठी किती कर्ज घेतले आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मुंबई, नागपुर, मेट्रो प्रकल्पांसाठी राज्य कर्जबाधित नसल्याबाबतचे (Debt Sustainability Certificate) प्रमाणपत्र केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार विभाग (Department of Economic Affairs) यांना पाठविणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. नागपूर मेट्रो प्रकल्पांकरिता सदर प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे. या तीन शहरांची लोकसंख्या ही महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येच्या ४२.०५% आहे व राज्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत १९% आहे. तसेच या शहरांतील वाढलेल्या उद्योग व व्यवसायामुळे लोकसंख्येमध्ये सातत्याने वाढ होत असून त्याचा नागरी वाहतुक व्यवस्थेवर मोठया प्रमाणावर ताण पडत आहे. वाहतुक व्यवस्थेवरील ताण कमी करुन वाहतुक व्यवस्था सुलभ करण्यासाठी या शहरांमध्ये मेट्रो प्रकल्प राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. हे प्रकल्प राबविताना ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होते, असे म्हणणे खरे नाही.

सदर मेट्रो प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्ज तसेच भांडवली खर्चाचा भाग सन २०१६-१७ या वर्षीच्या अर्थसंकल्पातील भांडवली खर्चाच्या तुलनेत ४.३३% आहे. तसेच या प्रकल्पासाठीच्या कर्जाचा भार ग्रामीण जनतेवर पडणार नाही याची शासन स्तरावर दक्षता घेण्यात येणार आहे.

(५) राज्याद्वारे साधारणत: कर्जे ही कुठल्याही विशिष्ट उद्देशांसाठी उभारली जात नसून राज्याच्या सर्व विकास कामासाठी एकत्रितरित्या उभारली जातात. शासनाने खालीलप्रमाणे निव्वळ कर्ज उभारलेली आहेत. सन २०१५-१६ रुपये २९१५२.५५ कोटी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते सप्टेंबर-२०१६) रुपये १६४०७.६० कोटी वरीलपैकी काही कर्जे उदा. नाबार्ड, राष्ट्रीय सहकार व विकास महामंडळ या वित्तीय संस्था याचेकडून घेतलेली कर्जे विशिष्ट अशा योजनेसाठी घेणेत आली आहेत.

-----------------

**बोईसर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी काटकरपाडा येथे जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२३) * २५३२१ श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) मधील ग्रामीण रुग्णालयासाठी काटकरपाडा, सर्व्हे नं.१०७/१ (अ) ही जागा मंजूर झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ९ मार्च, २०१६ मध्ये जमिनीची मोजणी होऊनही जमीन रुग्णालयाच्या ताब्यात देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने आदिवासीबहुल जिल्ह्यात आरोग्यसेवेचा गंभीर प्रश्न पाहता सदर जागा रुग्णालयाच्या ताब्यात देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर जागेची फेरमोजणी दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी करण्यात आली असून, जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केळापूर (जि.यवतमाळ) या आदिवासी तालुक्यातील ट्रॉमा केअर युनिटमधील यंत्रसामुग्री विनावापर असल्याबाबत**

**(२४) * २५०८६ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केळापूर (जि.यवतमाळ) या आदिवासी तालुक्यातील ट्रॉमा केअर युनिटकरिता तज्ञ डॉक्टर शासनाने उपलब्ध करुन न दिल्याने या ट्रॉमा केअर युनिटचा रुग्णांना फायदा होत नसून लाखो रुपये किंमतीची यंत्रसामुग्री अनेक वर्ष विनावापर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे राष्ट्रीय तथा राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळण्यास अत्यंत गैरसोय होत असल्याने अनेकांना प्राण गमवावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) नाही.

ट्रॉमा केअर युनिट केळापूर जि.यवतमाळ येथे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे. रुपये ५४००) ची ५ पदे मंजूर असून सदर सर्व पदे

भरलेली आहेत. भरलेल्या पदांवर १ अस्थिव्यंगतज्ञ, १ बधिरिकरणतज्ञ, १ बालरोग तज्ञ व २ एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे मनोर (जि.पालघर) मधील मनोर ग्रामीण रुग्णालयात**
**मुदतबाह्य औषधे फेकून दिल्याबाबत**

**(२५) * २४८६६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मनोर (जि.पालघर) मधील मनोर ग्रामीण रुग्णालयात सन २०१५ मध्ये खरेदी केलेल्या औषधांची मुदत माहे मार्च, २०१४ ते ऑगस्ट, २०१५ मध्ये संपल्यामुळे फेकून दिल्याबाबतचे निवेदन भुमिसेनेचे सचिवांनी शासनाला दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मनोर ग्रामीण रुग्णालयात औषधे बाहेरून खरेदी करण्यासाठी लिहिली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

तथापि, सदर विषयाबाबत दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ९/८/२०१६ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) दैनिक लोकमत या वृत्तपत्रात दिनांक ९/८/२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने सहायक संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), ठाणे यांच्या अध्यक्षतेखालील द्विसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदरहू चौकशीत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीमध्ये तथ्य आढळून आले नाही. तथापि, कालबाह्य झालेली औषधे व्यवस्थित बंद खोलीत ठेवण्यामध्ये निष्काळजीपणा झाल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने संबंधित औषध निर्माण

अधिकारी यांना दिनांक २६/१०/२०१६ रोजी उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे मंडळ, ठाणे यांच्यामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिरपूर (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील सेठ आहुजा आश्रमशाळेतील विद्यार्थींनी मृत्यूमुखी पडल्याबाबत**

**(२६) * २४६८१ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरपूर (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील सेठ आहुजा आश्रमशाळेतील आजारी विद्यार्थीनीला चिंचवड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले असताना तेथील डॉक्टरांनी पितृमोक्ष अमावस्येची सुट्टी असल्याने ओपीडी बंद असल्याचे कारण दिल्याने वेळेत उपचार न झाल्याने तिचा नागपूर येथील रुग्णालयात मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील मकरधोकडा व पुराडा येथील आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सेठ आहुजा शाळेतील आजारी विद्यार्थीनी कुरुक्मीनी महादेव कुंभरे हिची आश्रम शाळेतच तब्येत बिघडली. दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी पितृपक्ष अमावस्या असल्याने ओपीडी जरी त्या दिवशी बंद असली तरी सदर दिवशी वैद्यकीय अधिकारी रुग्णालयात हजर होते. तथापी शाळेतील शिक्षकाने त्या रुग्णास दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी रुग्णालयात आणले असता सदर रुग्णास भरती करुन घेण्यात आले. तद्नंतर सदर रुग्णास के.टी.एस. सामान्य रुग्णालय, गोंदिया येथे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी भरती करण्यात आले. परंतु दोन्ही ठिकाणी करण्यात आलेल्या उपचारास रुग्णाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर येथे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी रुग्णास भरती करण्यात आले. तेथे औषधोपचार सुरु असतानाच सदर विद्यार्थीनीचा मृत्यू झाला.

(२) दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी पितृपक्ष अमावस्या असल्याने ओपीडी जरी त्या दिवशी बंद असली तरी सदर दिवशी वैद्यकीय अधिकारी रुग्णालयात हजर होते. त्यामुळे या कारणास्तव मकरधोकडा पुराडा येथील दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला नाही.

(३) उपसंचालक आरोग्य, नागपूर यांना सदर प्रकरणी चौकशी करण्याबाबत निर्देश देण्यात आले. सदर प्रकरणाचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो विचारात घेवून आवश्यकतेनुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुचांबे खोऱ्यात (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) प्रशासकीय मान्यता असलेला गडनदी धरण प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(२७) * २६१४३ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुचांबे खोऱ्यात (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) १०.३७ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता असलेला गडनदी धरण प्रकल्प रुपये ५६५.१९ कोटी खर्च होऊन पूर्ण झाल्यानंतर एक हेक्टरही क्षेत्र ओलिताखाली आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन, भूसंपादन आणि कालवे या सर्वच बाबी अर्धवट व प्रलंबित असून त्यासाठी अजून रुपये १०८ कोटीची गरज असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९८३ मध्ये रुपये १०.३७ कोटींची प्रशासकीय मान्यता देत सुरु करण्यात आलेला हा प्रकल्प अजूनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

गडनदी मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्याच्या ५.०० कि.मी पर्यंत १०३.०० हेक्टर सिंचनासाठी क्षेत्र निर्माण झाले आहे. सन २०१५-१६ मध्ये चाचणी घेण्यासाठी पाणी दिले असता प्रत्यक्ष ४३ हेक्टर सिंचन करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

एकूण बाधीत ५४२ कुटुबांपैकी २१६ कुटुंबाचे स्वेच्छा पुनर्वसन, ३२६ कुटुंबाचे पुनर्वसन अधिनियमानुसार पुनर्वसन करावयाचे आहे. नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत. धरणासाठी एकूण ३५१.४० हेक्टर क्षेत्रापैकी ३२१.०० हेक्टर क्षेत्राचे संपादन करण्यात आले आहे. उर्वरीत ३०.४० हेक्टर चे निवाडे जाहीर झाले आहेत. कालव्यासाठी अंदाजे ३२२.०० हेक्टर पैकी १२८.३२ हेक्टर क्षेत्राचे संपादन पूर्ण आहे. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी २४७.१७ कोटी निधी आवश्यक आहे.

प्रकल्पाच्या धरणाचे काम बहुतांश पूर्ण असून डावा कालवा कि.मी ०७.०० व उजवा कालवा कि.मी २०.०० पर्यंतची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकल्प प्रधान मंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत (PMKSY) माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) होय.

(४) गडनदी प्रकल्पाची कामे शीघ्र गतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने, प्रकल्पाचा प्रधान मंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत (PMKSY) सन २०१६-१७ मध्ये समावेश केला असून डिसेंबर २०१९ पर्यंत संकल्पित ३१११ हेक्टर क्षेत्र सिंचन निर्मिती करण्यासह प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पासाठी रु.६१.७९ कोटी इतके केंद्रीय अर्थसहाय्य तसेच रु.१८५.३८ कोटी इतके नाबार्ड कर्ज उपलब्ध होणार आहे.

-----------------

## आंधळगाव महमदाबाद (शे) (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) ला जोडणाऱ्या महमदाबाद हद्दीतील रस्त्याची दूरवस्था झाल्याबाबत

**(२८) * २३९२१ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंधळगाव महमदाबाद (शे) (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) ला जोडणारा महमदाबाद हद्दीतील रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर खड्डे पडले असून चिखल झाल्याने या रस्त्यावरुन प्रवास करणे धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद बांधकाम विभागाने या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) सदर रस्त्यावर खड्डे पडले आहेत. तथापि प्रवास करणे धोकादायक असल्याची वस्तुस्थिती नाही. वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(३) पावसाळ्यानंतर प्रश्नांकित रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्याचे काम जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग मंगळवेढा यांच्याकडील उपलब्ध मैलजुरांमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्याच्या वाट्यास आलेले नर्मदा खोऱ्यातील पाणी तापी खोऱ्यात वळविणेबाबत**

**(२९) * २३६१८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १९३५३ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नर्मदा जल लवाद आयोगाच्या निवाड्यानुसार महाराष्ट्राच्या वाट्यास आलेल्या १०.८९ अघफु पाण्यापैकी नर्मदा खोऱ्यातील ५.५९ अघफू पाणी तापी खोऱ्यात वळविणे या प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या रुपये ६,४२,४९,६००/- किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक १३ जानेवारी, २००९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या रुपये १२ कोटी ९१ लाख १९ हजार ५०० किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ९ ऑगस्ट, २०११ चे शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांना सिंचन सुविधा पुरविणेसाठी उकाई धरणातून उपलब्ध होणारे ५ अघफू पाणी उपसा करून सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पुढे संभाव्यता अहवाल (Pre feasibility report) तयार करण्याची क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, राज्याच्या वाट्यास आलेले नर्मदा खोऱ्यातील पाणी तापी खोऱ्यात वळविणेसंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, महाराष्ट्रातील सततची अवर्षण परिस्थिती व राज्यातील गोदावरी, तापी इ. खोरे तुटीचे असल्याने महाराष्ट्राच्या वाट्याचे उपलब्ध पाणी व पश्चिमवाहिनी नद्यातील वाया जाणारे प्रचंड पाणी शीघ्र तितक्या लवकर वापरात आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) नर्मदा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्यास आलेल्या १०.८९ अघफू पाण्यापैकी ५.५९ अघफू पाणी नंदुरबार जिल्ह्यातील तापी खोऱ्यात वळविण्याकरिता नर्मदा तापी वळण योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे सल्ल्याने अंतिम करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) पश्चिमेकडील अरबी समुद्रास वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी ८ प्रवाही वळण योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण, १२ प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्प्यांवर प्रगती पथावर आहेत.

एकदरे (दमणगंगा) ते गोदावरी खोरे या नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती राज्य शासनाने राष्ट्रीय जल विकास अभिकरण यांना दिनांक १२/३/२०१५ च्या पत्रान्वये केलेली आहे.

नार-पार, अंबिका, औरंगा या ४ खोऱ्यातील पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे तापी खोऱ्यात वळविण्यासाठी योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास दिनांक २३/१२/२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे. त्याच प्रमाणे नार, पार, अंबिका, औरंगा, दमणगंगा या पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता, स्थानिक पाण्याची गरज लगतच्या अन्य खोऱ्यात पाणी वळविण्याचे पर्याय याबाबतचा बृहत आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## विजघर, घाटीवडे, बांबर्डे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे जंगली हत्तींनी पिकांचे नुकसान केल्याबाबत

**(३०) * २५९५७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विजघर, घाटीवडे, बांबर्डे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे तीन जंगली हत्तींनी भातपिक, केळी, माड, सुपारीच्या बागांचे नुकसान केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक शेतकरी घाबरले असून हत्तींकडून होणाऱ्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी अशी येथील शेतकऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने निर्णय घेऊन येथील शेतकऱ्यांचे एक वर्षाचे प्रतिज्ञापत्र घेऊन त्या आधारे नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे, मौजे घाटीवडे, बांबर्डे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे तीन जंगली हत्तींनी भातशेती/फळबागांचे नुकसान केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आलेले आहे. तथापि मौजे विजघर परिसरात जंगली हत्तींनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नुकसान केलेले नाही.

(२) व (३) माहे सप्टेंबर २०१६ मध्ये हत्तीकडून मौजे घाटीवडे व बांबर्डे या परिसरात नुकसनीच्या २० घटना घडलेल्या असून, संबंधित शेतकऱ्यांना प्रचलित शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई रुपये २,७१,२२०/- अदा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर झालेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३१) * २३५७५ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९५३४ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड, जिल्हयासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत (सर्वसाधारण) सन २०१५ - १६ करिता मंजूर झालेले रूपये १५० कोटी ९९ लाखाचा निधी मार्च, २०१६ अखेर पर्यंत १०० टक्के खर्च करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयाचा रूपये १० कोटी ६१ लाख इतका निधी खर्च न होण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, निधी खर्च न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांसंदर्भात कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी यंत्रणेचे प्रमुख/प्रशासकीय विभाग यांना केव्हा कळविले आहे व सदर प्रकरणी प्रमुख/प्रशासकीय प्रमुख यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ई-निविदा प्रक्रीया पुर्ण न होणे, तांत्रिक मान्यता मिळाली नसल्याने तसेच योजनेच्या मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे निधी खर्च झाला नाही.

(३) व (४) सर्व कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करण्यात आलेला निधी खर्च केला नसल्याने संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी संबंधित यंत्रणेच्या विभाग/ प्रशासकीय प्रमुखांना दिनांक १२/०४/२०१६ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सूचित केले आहे. विभाग/प्रशासकीय प्रमुखांकडून संबंधित अधिकाऱ्यांवर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती मागविण्यात आली आहे.

-----------------

## औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात मनोविकृत विभाग, स्किझोफ्रेनिया विभाग बंद असल्याबाबत

**(३२) * २५२०३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक २२१८२ ला दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात मागील दोन वर्षापासून मनोविकृती विभाग, स्किझोफ्रेनिया विभाग बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच घाटी रुग्णालयातील डायलिसीस यंत्रे देखभाल दुरुस्तीअभावी निकामी झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औषध पुरवठादाराचे रुपये ४ कोटी थकविल्याने पुरवठादाराने औषध पुरवठा बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एलिफंटा लेणी परिसरात भूस्खलनामुळे संरक्षण भिंतीलगतच्या जमिनीला तडे गेल्यामुळे लेण्यांना धोका

**(३३) * २५३६२ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एलिफंटा लेणी परिसरात भूस्खलनामुळे संरक्षण भिंतीलगतच्या जमिनीला तडे गेल्यामुळे लेण्यांना धोका पोहचण्याची भिती एलिफंटा लेणीचे केअरटेकर यांनी ही बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन स्थळ हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या ताब्यात आहे. या स्थळाचे जतन व संवर्धनाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व विभागाकडून करण्यात येते, अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ, महाराष्ट्र यांच्या अहवालानुसार जुलै ते सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे एलिफंटा गुफांच्या पूर्वेकडील टेकडी जवळील कुंपणाजवळील भुसभूशीत मातीमुळे जमिनीला तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. सदर स्थळाची सहायक अधीक्षक, पुरातत्व अभियंता यांच्यामार्फत कनिष्ठ संवर्धन सहायक एलिफंटा सब सर्कल यांच्या समवेत पाहणी करण्यात आली. सदर पाहणीचा अहवाल नवी दिल्ली येथील महासंचालक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण कार्यालयास दिनांक २८/१०/२०१६ रोजी माहितीसाठी व पुढील कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ कार्यालयामार्फत पाठविण्यात आला आहे. प्रश्नाधीन बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

-----------------

**कळसुली ग्रामपंचायत (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) अंतर्गत देवऋषीवाडी शेजारील बौध्दवाडी (कदमवस्ती) येथील रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत**

**(३४) * २३५६२ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २२०७८ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळसुली ग्रामपंचायत (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) अंतर्गत देवऋषीवाडी शेजारील बौध्दवाडी (कदमवस्ती) येथे जाण्या-येण्यास रस्ता नसल्याने रुग्णास व वृध्द ग्रामस्थांस औषधोपचारासाठी पाठीवर वाहून १ कि.मी. अंतरावर असलेल्या मुख्य रस्त्यापर्यंत न्यावे व आणावे लागत असल्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे दिनांक १ मे, २०१६ रोजी व त्यानंतर माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बौध्दवाडीपर्यंतच्या रस्त्याचे बांधकाम करण्यास तेथील ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कणकवली, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद सिंधुदूर्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग तसेच मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे गेल्या अनेक वर्षापासून वारंवार निवेदने, विनंती-अर्ज सादर करुनही कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कळसुली ग्रामपंचायतीस राज्य शासनाकडून तसेच केंद्रीय वित्त आयोगाकडून (गतवर्षीच्या चौदाव्या वित्त आयोगासह) करोडो रुपयांचा निधी प्राप्त होवून देखील सदर रस्ता बांधकामाप्रकरणी जिल्हा प्रशासनाकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याच्या तक्रारी देखील संबंधित ग्रामस्थांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बौध्दवाडी (कदमवस्ती) येथील रस्ता बांधकाम प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, सदर रस्त्यालगत वहाळ असल्याने ८१.५० मीटर लांबीची संरक्षक भिंत बांधण्यात आलेली आहे. त्यापैकी ३१.५० मीटरचे बांधकाम सन २०१५-१६ मध्ये योजनेतून ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेले आहे.

--------------------

**देवाचे गोठणे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत**

**(३५) * २४५६४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १७२६० ला दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवाचे गोठणे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत सिमेंट व वळण बंधाऱ्यांची कामे दर्जाहीन व गुणवत्तहीन झालेली असून त्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता होऊन शासकीय निधीचा अपहार झाल्याप्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यादरम्यान तत्कालीन मा.जलसंधारण मंत्री, मा.जलसंधारण राज्यमंत्री, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, आयुक्त कृषी, पुणे व जिल्हाधिकारी, रत्नागिरी इत्यादींकडे लेखी स्वरुपात तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच जनहित समिती, देवाचे गोठणे यांनी दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रत्नागिरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी, प्रकल्प संचालक, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे इत्यादींना निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) होय. आयुक्त कृषि तथा मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे कार्यालयास दिनांक १८/६/२०१६ रोजी यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(३) चौकशी अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, रत्नागिरी यांनी दिनांक २८/११/२०१६ रोजी सदर चौकशी अहवाल वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे कार्यालयास सादर केला आहे. चौकशी अहवालातील मुद्यांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे यांना वसुंधरा पुणे कार्यालयाने सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------

## परभणी जिल्हयातील मुलींचा जन्मदर वाढविणेबाबत

**(३६) * २४४७५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे मुलींचा जन्म दर घटल्याचे जिल्हा रूग्णालयाच्या सन २०१६ च्या माहितीवरून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी आरोग्य विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) मुलींचा जन्मदर वाढविण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना केली आहे.

- जिल्हयातील सर्व सोनोग्राफी व एम.टी.पी. सेंटरची धडक मोहीमेद्वारे तपासणी केली जाते.
- स्त्री-भ्रृण हत्या संबंधित रॅली काढणे, पोस्टर लावणे, बॅनर प्रदर्शन करणे, कलापथक सार्वजनिक ठिकाणी सादर करुन जनजागृती करण्यात येते.
- “बेटी बचाओ बेटी पढाओ,” या कार्यक्रमाची सुरुवात माहे एप्रिल, २०१६ पासून करण्यात आली असून वैद्यकीय अधिकारी, आरोग्य संस्था, ए.एन.एम. व आशा यांची कार्यशाळा आयोजित करुन या कार्यक्रमाविषयी सर्वकक्ष माहिती देऊन जनजागृती करण्यात येत आहे.
- जिल्हयातंर्गत प्राप्त होणाऱ्या हेल्पलाईन वरील तक्रारीबाबत कार्यवाही करण्यात येते.
- खबऱ्या मार्फत संशयीत सोनोग्राफी किंवा एम.टी.पी. सेंटरची माहिती मिळवून त्याद्वारे डिकॉय अथवा स्टिंग ऑपरेशन करण्यात येते.
- समुचित प्राधिकारी यांच्याकरिता कार्यशाळा आयोजित करुन पीसीपीएनडीटी कायद्याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.
- जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता पथक (Task Force) स्थापन करण्यात आलेली असून त्याद्वारे जिल्हयातील पीसीपीएनडीटी विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणे इत्यादी उपाययोजना केल्या जातात.

- पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतुदीचा भंग करणाऱ्या विरुध्द राज्यातील समुचित प्राधिकाऱ्याकडून कार्यवाही करण्यात येते.
- नोंदणीकृत व्यवसायिकांकडून खरेदी केलेल्या सोनोग्राफी मशीनची नोंदणी राज्य समुचित प्राधिकाऱ्याकडे करणे बंधनकारक आहे.
- सील केलेल्या सोनोग्राफी केंद्राच्या दर्शनी भागावर तशा आशयाचा फलक प्रदर्शीत करणे आवश्यक केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोळगिरी ते व्हसपेठ (ता.जत, जि. सांगली) या गावातील वनविभागाच्या जमिनीत जे.सी.बी. मशिनद्वारे काम सुरु केल्याबाबत**

**(३७) * २५६०९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळगिरी ते व्हसपेठ (ता.जत, जि. सांगली) या गावाच्या मध्यभागी असलेल्या वनविभागाच्या जमिनीत येथील वन विभागाच्या अधिका-यांनी मजुरांकडून काम करुन न घेता कर्नाटकातील जे.सी.बी मशीनद्वारे कामे सुरु केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त काम वनक्षेत्रपाल व कांही कर्मचारी हातमिळवणी करुन जे.सी. बी. मशिन्सद्वारे कामे करुन पैसा जमवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार दोषी असणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

ज्या अतिकठीण ठिकाणी मजूरांकडून खुदाईचे काम झाले नाही, त्या ठिकाणी जे.सी.बी. मशिनद्वारे काम करुन घेण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) सदर काम जे.सी.बी. मशिनद्वारे करण्यासाठी पुर्व परवानगी घेतली नसल्याने तसेच वित्तीय नियम प्रणालीचे पालन वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी केले नाही म्हणून सहा. वनसंरक्षक, सांगली यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून त्याअनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येत आहे. सदर कामाच्या मजूरीची रक्कम धनादेशाद्वारे बँकेमार्फत संबंधितांना अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (मेयो) रुग्णालयाचा जिल्हा विकास निधी परत गेल्याबाबत

**(३८) * २५२२५ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (मेयो) रुग्णालयाला जिल्हा विकास निधी अंतर्गत सन २०१५-२०१६ या वर्षात प्राप्त झालेला रूपये १७ लाखांचा निधी रुग्णालयातील अधिकाऱ्याच्या मनमानी कारभारामुळे परत गेल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेयो) रुग्णालयाला जिल्हा विकास निधी अंतर्गत सन २०१५-२०१६ या वर्षात एकूण ३ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी बहुतांश निधीतून शासन व संचालनालय स्तरावर यंत्रसामग्री खरेदी करण्यात आलेली आहे. याविषयी संस्थास्तरावरील काही बाबींच्या खरेदीप्रक्रियेत काही त्रुटी निर्दशनास आल्याने संस्थास्तरावरील सुमारे १७ लक्ष रुपयांची खरेदीप्रक्रिया संस्थास्तरावर रद्द करण्यात आली होती. त्यामुळे एकूण प्राप्त निधीपैकी काही निधी जिल्हा नियोजन समितीस समर्पित करण्यात आला होता.

(२) सदर प्रकरणी रुग्णालय प्रशासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियान व जिल्हा नियोजन समितीची बोगस कामे दाखवून शासनाचा निधीचा अपहार केल्याबाबत

**(३९) * २६२१५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे किन्होला, पिंपळगाव, एकरुखा, काष्टगाव, ब्रम्हपुरी, वडगाव तर्फे टाकळी, भोगाव, पान्हेरी, मोहपुरी, मांडखळी, पेडगाव, आळंद व जांब (जि.परभणी) येथील तालुका कृषि अधिकारी व कृषि पर्यवेक्षक व जिल्हा अधिकारी कृषि अधिकारी यांनी ठेकेदारांशी संगनमत करून जलयुक्त शिवार अभियान व जिल्हा नियोजन समितीची बोगस कामे दाखवून शासनाचा निधीचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोगस कामांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी मा.कृषि मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोगस कामे करणाऱ्या संबंधितांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी यांचे मार्फत चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात सिकलसेलच्या आजाराच्या तपासणीचे लक्ष्यांक पुर्ण करण्यासाठी आवश्यक किट उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४०) * २५८४९ श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात अत्यंत गंभीर असलेल्या सिकलसेल आजाराची तपासणी किटच जिल्हा आरोग्य विभागाकडे उपलब्ध नसल्यामुळे सिकलसेल तपासणी रखडल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यात सन २०१६-२०१७ साठी सिकलसेल तपासणीसाठी दिलेल्या दोन लाख तपासणीच्या लक्ष्यापैकी केवळ दोन हजार जणांची तपासणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आवश्यक किट उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अशंत: खरे आहे.

सिकलसेल आजाराच्या तपासणीसाठी सोल्युबिलीटी व इलेक्ट्रोफोरेसीस या दोन चाचण्या करण्यात येतात. त्यासाठी जिल्ह्यांना किट्सचा पुरवठा राज्यस्तरावरुन करण्यात येतो. तथापि, सन २०१५-१६ करिता सोल्युबिलिटी व इलेक्ट्रोफोरेसीस या दोन्ही किटची खरेदी प्रक्रिया अद्याप पर्यंत पूर्ण न झाल्याने माहे जून, २०१६ पासून बफर सोल्युशनद्वारे सिकलसेल तपासणी तयार करण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्ह्यात वर्षभरासाठी दोन लाखाचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्यापैकी माहे एप्रिल, २०१६ ते ऑक्टोबर, २०१६ पर्यंत ७,९२८ व्यक्तींची तपासणी करण्यात आलेली आहे. सोल्युबिलीटी व इलेक्ट्रोफोरेसीस या दोनही किट्स ची खरेदी केल्यानंतरच सदरचे उद्दीष्ट पूर्ण करण्यात येईल.

(३) सोल्युबिलिटी व इलेक्ट्रोफोरेसीस या दोनही किट्सच्या खरेदी प्रक्रियेस विलंब लागत असल्यामुळे संबंधित सर्व जिल्ह्यांना त्यांच्याशी जोडणी करण्यात आलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून बफर सोल्युशन तयार करुन घेणे व त्याद्वारे सोल्युबिलिटी व इलेक्ट्रोफोरेसीस या दोनही चाचण्या करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. तसेच जिल्हास्तरावर बफर सोल्युशनसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्याची परवानगी दिनांक १/१०/२०१६ व दिनांक १९/१०/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत बफर सोल्युशनद्वारे सिकलसेल चाचणी करण्यात  येत आहे. आता खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून उपरोक्त किट्स चा पुरवठा आदेश लवकरच निर्गमित करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात औषध महामंडळ स्थापन करण्याच्या निर्मितीबाबत**

**(४१) * २४३८९ श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २०४०९ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औषध खरेदीतील गैरव्यवहार संपवून पारदर्शकता आणण्यासाठी औषध खरेदी महामंडळ स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटा ट्रस्टच्या माध्यमातून या महामंडळाची निर्मिती करणारा सामंजस्य करारही करण्यात आला व या महामंडळाच्या उभारणीसाठी येणारा रुपये ४५ कोटी खर्च करण्याचे टाटा ट्रस्टने मान्य केल्यानंतर महामंडळ निर्मितीचा प्रस्ताव करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू औषध खरेदी महामंडळाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच औषध खरेदी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय होवून सदरहू निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे का,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) महाराष्ट्र स्टेट मेडीकल सप्लाय कार्पोरेशन स्थापन करण्याबाबत अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) राज्यातील आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी टाटा ट्रस्ट यांच्यासमवेत दिनांक ३१/३/२०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर करारातील तरतूदीनुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या खरेदी/वितरण धोरणाचा अभ्यास करुन महाराष्ट्र स्टेट मेडिकल सप्लाय कार्पोरेशन स्थापन करण्याच्या दृष्टीने टाटा ट्रस्ट यांनी अहवाल सादर करावयाचा होता. त्या अनुषंगाने टाटा ट्रस्ट यांनी दिनांक १५/६/२०१६ रोजी महाराष्ट्र स्टेट मेडिकल सप्लाय कार्पोरेशन स्थापन करण्याच्या दृष्टीने अंतरिम अहवाल (Draft Report) शासनास सादर केला आहे.

तथापि, सदर महामंडळाच्या उभारणीसाठी येणारा खर्च टाटा ट्रस्ट तर्फे करण्यात येणार नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## आरोग्य विज्ञान विद्यापीठांचा कारभार सक्षमपणे चालविण्यासाठी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) * २३९९७ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळी सन १९९८-१९९९ मध्ये विद्यापीठांचा कारभार सक्षमपणे चालविण्यासाठी किमान ६०० कर्मचाऱ्यांची पदे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले असतानाही प्रत्यक्षात गेल्या १० वर्षात विद्यापीठांत अवघी ३२७ पदे भरण्यात आली असून त्यातील पहिल्या टप्प्यात शासनाकडून ११७ पदांना मान्यता देण्यात आली, तद्नंतर विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आणखी ८३ पदांना मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विद्यापीठातील मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांच्या वेतन व अन्य भत्याप्रित्यर्थ शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू विद्यापीठातील मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी प्रत्यक्षात किती निधीची आवश्कयता आहे व त्यापैकी शासनाकडून प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,

(४) आरोग्य विज्ञान विद्यापीठाला शासनाकडून मिळणाऱ्या अपुऱ्या निधीमुळे या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविदयालयात शिक्षण घेणाऱ्या सव्वा लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना परीक्षांचे नियमन व शिक्षण विषयक अन्य बाबी हाताळताना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आरोग्य विज्ञान विद्यापीठांस आवश्यक तो निधी नियमितपणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार विद्यापीठात आजतागायत एकूण २२८ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) सन २०१६-१७ साठी वेतन व भत्यासाठी रुपये ७.६४ कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर मंजुर निधी पुरेसा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर येथे केंद्र शासनातर्फे जाहीर करण्यात आलेल्या मुद्रा लोन योजनेबाबत**

**(४३) * २५५६८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे केंद्र शासनातर्फे जाहीर करण्यात आलेल्या मुद्रा लोन योजनेबाबत बँकाकडून ग्राहकांची अडवणूक होत असून या योजनेचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळावा अशी मागणी येथील ग्राहक समितीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारा केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाची दखल घेवून शासनाने येथील सर्व राष्ट्रीयकृत बँकांना मुद्रा लोन देण्यासंदर्भात अंमलबजावणी व्हावी यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) ग्राहक समितीने अशा स्वरुपाचे निवेदन दिल्याचे आढळून आले नाही. तथापि, मुद्रा लोन देण्यासंदर्भात तातडीने अंमलबजावणी व्हावी यासाठी जिल्हास्तरीय बैठकांमधून बँकांना नियोजित वेळेत प्रकरणांचा निपटारा करण्याच्या सूचना जिल्हा अग्रणी बँकेकडून देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सिंचन प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४४) * २५५९६ श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५४९६ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रखडलेले सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी एक रक्कमी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी आगामी चार महिन्यात निर्णय घेतला जाणार असून यासाठी जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य घेण्याची शासनाची तयारी असल्याची माहिती राज्याचे मा. जलसंपदा मंत्री यांनी म्हैसाळा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी दिनांक १८/१०/२०१५ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती प्रकल्प रखडलेले आहेत त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, सदरचे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, पश्चिम महाराष्ट्र विशेषत: सातारा जिल्ह्यात अनेक तालुके दुष्काळग्रस्त असून त्यातील निधी अभावी बंद प्रकल्पाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) राज्यातील बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी, वेगवेगळया वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य घेण्याची शासनाची तयारी असल्याचे मा.मंत्री, जलसंपदा यांनी म्हैसाळा योजनेच्या उद्‌घाटन प्रसंगी सांगितले.
(२) राज्यात ३७६ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. या प्रकल्पांची दिनांक १/४/२०१६ रोजीची संभाव्य उर्वरित किंमत (नवीन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादनाच्या वाढीव किंमतीसह) सुमारे रुपये ८४,४३० कोटी इतकी आहे.

प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेत समाविष्ट २६ बांधकामाधीन प्रकल्प पुढील ३ वर्षात पूर्ण करणेसाठी रुपये ३८३० कोटी एवढे केंद्रीय अर्थसहाय्य व उर्वरित रुपये १२७७३ कोटीएवढे दीर्घ मुदतीचे (१५ वर्ष) व कमी व्याजदराचे (६%) कर्ज नाबार्डकडून मिळणार आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडे विदर्भ-मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त जिल्हयातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ७१८७ कोटी व कायमस्वरुपी दुष्काळी भागातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ३५०० कोटी विशेष पॅकेजची मागणी केली आहे.

या व्यतिरिक्त नाबार्डकडून रुपये १००० कोटी कर्जाची मागणी करणेत आली आहे. तसेच पुढील ३ वर्षात दरवर्षी रुपये ५००० कोटी या दराने रुपये १५००० कोटी एवढा निधी बाँडव्दारे उभा करण्याचा प्रस्ताव आहे. अशारितीने विविध माध्यमातून निधी उभारुन जास्तीत जास्त प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) सातारा जिल्हयातील धोम बलकवडी, तारळी, मोरणा (गुहेघर), वांग, व कुडाळी या ५ प्रकल्पांचा अंतर्भाव प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेत असून केंद्र शासनाच्या अर्थ सहाय्यातून व नाबार्डच्या कर्जातून हे प्रकल्प डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या प्रकल्पांसाठी केंद्रीय सहाय्य रुपये १५८.८२ कोटी व नाबार्डकडून रुपये १०१६.८० कोटी कर्ज उपलब्ध होणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अभिमत विद्यापीठातील प्रवेश प्रक्रियेबाबत**

**(४५) * २४२०९ श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभिमत विद्यापीठांतर्गत येणा-या वैद्यकीय शिक्षणाच्या ८५ टक्के जागा विद्यार्थ्यांना तर १५ टक्के जागा अखिल भारतीय पातळीवर देण्यात याव्यात असा निर्णय राज्याच्या वैद्यकिय विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय मा. उच्च न्यायालयाने रद्द ठरविल्याने या जागांवर अवलंबून असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवेशाबाबत पालक व विद्यार्थ्यांनी मंत्रालयासमोर आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वैद्यकीय महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अभिमत विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया सुरु होती.

(३) या संदर्भातील कोणतेही निवेदन किंवा आंदोलनाची सूचना प्राप्त झाली नव्हती.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सिव्हील अपिल क्रमांक ९८३५/२०१६ (एसएलपी (सी) २६५५८/२०१६) मध्ये दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१६ रोजीपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

-----------------

**जळगाव जिल्ह्यातील निम्न तापी प्रकल्पांच्या भूसंपादनाबाबत**

**(४६) * २६३२६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील निम्न तापी प्रकल्पांच्या भूसंपादनाबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निम्न तापी प्रकल्पांच्या भूसंपादनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १९/१०/२०१६ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत घोडसगांव, बुधगांव, पाडळसे व सात्री या फक्त चार गावांचे टप्पा-१ व टप्पा-२ नुसार भूसंपादन करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले.

टप्पा-१ मधील भूसंपादनाची कार्यवाही प्रगती असून टप्पा-२ मधील चार गावांचाही सदर भूसंपादन कार्यवाही समावेश करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दमणगंगा व नार-पार, औरंगा, अंबिका इ. खोऱ्यातील जलनियोजनाबाबत गठीत केलेल्या सनियंत्रण समितीच्या अहवालातील शिफारशींबाबत**

**(४७) * २३७४३ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा व नार-पार, औरंगा, अंबिका इ. खोऱ्यातील जलनियोजनाबाबत दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी गठीत केलेल्या सनियंत्रण समितीने दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालातील महत्वाच्या शिफारशी काय आहेत, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अहवाल स्वीकृतीबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. सदर अहवालातील राज्याच्या हिताच्या दृष्टीने कोणत्या शिफारशी महत्वपूर्ण आहेत. याबाबत शासन स्तरावर अभ्यास करण्यात येत आहे. तद्नंतर सदर अहवालाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोदावरी नदीवरील बंधाऱ्याची दुरूस्ती न केल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(४८) * २६१०७ श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदीवरील बीड आणि जालना जिल्हयाच्या हद्दीवरील राजाटाकळी, मंगरूळ उच्च पातळी बंधाऱ्याच्या दरवाजाची देखभाल दुरुस्ती केली नसल्यामुळे गेवराई (जि.बीड) तालुक्यातील अनेक गावात बंधाऱ्याचे पाणी घुसल्याने शेतीसह मालमत्तेचे नुकसान झाल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च पातळी बंधाऱ्याच्या परिसरातील शेत जमिनीचे, रहिवाशी क्षेत्रातील मालमत्तेचे नुकसान झाल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, गेवराई (जि.बीड) तालुक्यातील काठोडासह इतर भागातील नुकसानग्रस्तांना शासकीय मदतीचे वाटप करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय

(२) राजा टाकळी उच्च पातळी बंधाऱ्याचे पूर नियंत्रण सुरळीतपणे पार पडल्याने या बंधाऱ्याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही मंगरुळ उच्च पातळी बंधाऱ्याची संबंधी पुढील चौकशी क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या क्षेत्राचे नुकसान भरपाईबाबत महसूल विभागाकडून पंचनामे करण्यात आले असून आर्थिक मदतीची कार्यवाही त्या विभागाकडून प्रगतीत आहे.

-----------------

**मौजे सावर (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथील फाजल खॉ बाबा दर्गाच्या सभोवती संरक्षक भिंत बांधण्याबाबत**

**(४९) * २५०९० श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावर (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथील फाजल खॉ बाबा दर्गा याचे पुरापासून संरक्षण करण्यासाठी संरक्षक भिंत बांधण्याचा प्रस्ताव तहसीलदार, बाभुळगांव यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी बेंबळा प्रकल्प उपअभियंता यांच्याकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार दर्गाच्या सभोवती संरक्षक भिंत बांधण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी संरक्षक भिंत बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) संरक्षक भिंतीच्या कामाचे सर्व्हेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(४) जलसंपदा विभागाने परिपत्रक क्र. एफडीडब्लू-१०९२/१७० (सिं.व्य.कामे), मंत्रालय, दिनांक ७/८/१९९२ नुसार पूर प्रतिबंधक योजनेच्या खर्चाच्या १० टक्के पर्यंतचा खर्च स्थानिक स्वराज्य संस्था तयार असतील तर तसे प्रमाणपत्र दिल्यानंतर जलसंपदा विभागातर्फे योजना प्रत्यक्ष राबविण्यात येते.

ग्रामपंचायत मौजा सावर यांनी पूर संरक्षक भिंतीच्या एकूण खर्चाच्या १० टक्के खर्च करण्याबाबत पूर्वी असमर्थता दर्शविली होती. सद्यस्थितीत दिनांक २१/१०/२०१६ च्या पत्रान्वये सदर ग्रामपंचायतीने १० टक्के खर्च लोकवर्गणीतून करण्याबाबत सहमती दर्शविली आहे.

----------------

## नाशेरा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये पदवीधर शिक्षकांची पदोन्नती करण्याबाबत

**(५०) * २५७२३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशेरा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील एकमेव जिल्हा परिषदेच्या १ ली ते ८ वीच्या वर्गशाळेला आदिवासी विद्यार्थ्यांसाठी पदवीधर शिक्षक मिळत नसल्याने सुमारे १२६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक व्यवस्थापन समितीने शाळेबाहेर आंदोलन करून शिक्षक भारतीने गटविकास अधिकारी व गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पदवीधर शिक्षकांना वेतोन्नती देण्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्थगिती दिली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील स्व.वसंतराव नाईक यांच्या पुतळयाचे सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५१) * २४६९८ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील दिवंगत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळा सौंदर्यीकरणाचे काम आर्थिक तरतूद करुनही प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पुतळ्याचे सौंदर्यीकरण पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी कोणतीही तक्रार नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. प्रश्नांकित काम प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बठाण-नळी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे दरवाजे बदलण्याबाबत**

**(५२)** * **२५८१४ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बठाण-नळी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे दरवाजे गंजून नादुरुस्त असल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत बंधाऱ्याला गळती लागल्याने नदीपात्रात पाणी असूनही भविष्यात या परिसरातील शेतकऱ्यांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय

(२) अंशत: खरे आहे.

(३) दिनांक १७/११/२०१६ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातली तरतूदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करण्यात आले आहे व पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने महामंडळास पाणीपट्टीच्या महसूलात उपलब्ध होणाऱ्या निधीमधून नवीन दरवाजे बसविण्याची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पर्यटन स्थळांच्या विकासाबाबत

**(५३) * २३६७९ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ११६२८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी पाच पर्यटनस्थळे विकसीत करण्यासंबंधी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित जिल्ह्याचे पर्यटन बृहत विकास आराखडे तयार करण्यांत येऊन जिल्हाधिकारी यांना त्यांचे जिल्ह्यातील आराखड्यातील कामांचे प्राधान्यक्रम सादर करणेबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत कळविण्यांत आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार ११ जिल्ह्यांचे प्राधान्यक्रम प्राप्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त आराखड्यांची पुनः तपासणी करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांना कळविण्यांत आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुर्नतपासणीचे सदरहु काम पूर्ण झाले आहे काय, प्रत्येक जिल्ह्यात ५ पर्यटन स्थळे विकसित करणेबाबत कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच नाशिक जिल्ह्यातील कोण-कोणत्या तालुक्यांचा पर्यटन स्थळ विकास योजनेत समावेश करण्यात आला आहे, लोणावळा-खंडाळाच्या धर्तीवर इगतपुरी पर्यटन स्थळ विकसीत करणेबाबत लोकप्रतिनिधी व जनतेकडून सातत्याने मागणी करण्यात येत आहे, या पार्श्वभुमीवर पर्यटनस्थळ विकास योजनेत इगतपुरीचा समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सद्य:स्थितीत २२ जिल्ह्यांचे प्राधान्यक्रम प्राप्त झालेले आहेत.

(३) होय.

(४) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत १० जिल्ह्यांच्या आराखड्यांची पुनर्तपासणी करण्यात आली होती. पुनर्तपासणीनंतर या १० जिल्ह्यांचे आराखडे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने शासनास सादर केले होते. त्याबाबत अधिक माहिती मागविण्यात आली आहे.

(५) पर्यटन बृहत विकास आराखड्यात पर्यटन क्षमतेनुसार स्थळांचा समावेश आहे. इगतपुरीचा नाशिक जिल्हा पर्यटन बृहत आराखड्यात समावेश करण्यात आलेला आहे.

-----------------

**राज्यात युवकांमध्ये मद्यपानाचे प्रमाण वाढल्याने किडनीचे आजार वाढल्याबाबत**

**(५४) * २५९६५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह, लठ्ठपणा, कोलेस्ट्रॉल या आजाराची दिवसेंदिवस वाढ होत असून युवकांमधील मद्यपानाचे प्रमाण वाढल्याने दरवर्षी ७० ते ८० किडनी प्रत्यारोपन होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मद्यपानामुळे किडनी निकामी होणाऱ्या रुग्णांचे सरासरी वय ३० ते ४० च्या आसपास असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मद्यपानापासून तरुणांना दूर ठेवण्यासाठी आरोग्य विभागामार्फत जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येतात. किडनीची समस्या सोडवण्याबाबत आरोग्य विभागातर्फे राज्यातील जिल्हा व सामान्य रुग्णालयात मोफत डायलिसिस सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे पूर्ण करण्याबाबत**

**(५५) * २३५७६ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९३९४ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात सन २०१५ - १६ करीता जलयुक्त शिवार अभियानांतर्गत माहे मार्च, २०१६ अखेर उद्दीष्टानुसार प्रगतीपथावर असलेली ३१ कामे पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीच्या शासन आदेश अन्वये सदर निधी माहे जून, २०१६ अखेर खर्च करण्याच्या सूचना देऊनही रुपये ४६ लाख निधी अखर्चित राहिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी अखर्चित ठेवणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मधील गावात रायगड जिल्ह्यात एकूण ९९१ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर ९३१ कामे पूर्ण करण्यात आली असून २२ कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत माहे जून, २०१६ अखेर रुपये ४७७.३६ लक्ष निधी खर्च करण्यात आला असून रुपये ३५.९७ लक्ष निधी शिल्लक आहे.

जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ अन्वये जलयुक्त शिवार अभियान विशेष निधीतील शिल्लक डिसेंबर, २०१६ अखेर खर्च करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ब्रम्हगव्हान (ता.पैठण, जि.औरंगाबाद) उपसा जलसिंचन योजनेस निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(५६) * २५२०५ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १४८७९ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ५५ गावातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सन २००९ मध्ये रुपये २२२ कोटीची ब्रम्हगव्हान उपसा जलसिंचन योजना मंजुर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेवर आतापर्यंत फक्त रुपये ९७ कोटी खर्च झाला व आणखी रुपये १५० कोटी रुपयाची आवश्यकता असताना या योजनेच्या कामासाठी सन २०१६-१७ करीता फक्त १०,००० रुपयाची तरतुद केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा निधी रुपये १५० कोटी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) होय,

या योजनेवर सप्टेंबर, २०१६ अखेर रुपये १२०.८९ कोटी खर्च झाला आहे. सन २०१६-१७ करीता रुपये १०,००० ची तरतूद केलेली आहे.

(३) सन २०१६-१७ मध्ये रुपये ३५ कोटीचा अतिरिक्त निधी मिळणेबाबबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. अर्थोपायाचे स्थितीनुसार निर्णय घेण्यात येईल.

(४) निधी उपलब्धतेनुसार भूसंपादन व कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

-----------------

**मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५७) * २४११४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील ग्रामपंचायत कार्यालयात प्रपत्र नमुना क्र.८ मध्ये काही लोकांनी गैर कायदेशीररित्या खाडाखोड करुन सुमारे १५० घरे स्वत:च्या नावावर करुन ग्रामपंचायतस्तरावर गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील ग्रामपंचायत कार्यालयामधील सन २००२-०३ च्या कर आकारणी नोंदवहीमध्ये नोंद असलेल्या १२९ मालमत्ता धारकांची नावे सन २००६-०७ मध्ये फेरआकारणी करण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये (प्रपत्र नमुन क्र.८ मध्ये) आढळून आलेली नाहीत.

(२) या प्रकरणी दोषी आढळून आलेले सध्या कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी श्री.बी.जी.पोपलाईत, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री.बी.आर.भोसले यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या अनुक्रमे दिनांक २६/१०/२०१६ व दिनांक १५/११/२०१६ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री.ए.एन.रावळे यांच्याविरुध्द दिनांक १५/११/२०१६ च्या पत्रान्वये विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कृषी विभागाच्या चाफकटर खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(५८) * २५६१० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाच्या चाफकटर खरेदीत १७.८६ लाखाचा गैरव्यवहार झाल्याचे चौकशी अहवालावरुन माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालात जिल्हा परिषदेचे १७.८६ लाखांचे नुकसान झाले असून, ई-निविदेत नियम डावलून प्रकिया राबवणे, ठराविक ठेकेदारासाठी निकष, अटी बदलणे, ठेका दिलेल्या पहिल्या ठेकेदाराने असमर्थता दर्शविल्यानंतर दुस-यांदा प्रकिया राबवितांना जादा झालेली रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात टाळाटाळ करणे आदि बाबी अहवालात नमुद करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सन २०१५-१६ मधील चाफकटर खरेदी प्रक्रियेची चौकशी करणेचे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद, सांगली यांनी आदेश दिले होते. त्यानुसार प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सांगली यांनी दिनांक ३१/८/२०१६ अन्वये अहवाल सादर केला. सदर अहवालाच्या अंतिम निष्कर्षामध्ये जिल्हा परिषदेस नविन निविदा प्रक्रियामध्ये वाढीव दर प्राप्त झाल्याने व त्यानुसार खरेदी केल्याने जिल्हा परिषदेचे रक्कम रुपये १७,८६,०००/- चे अप्रत्यक्ष नुकसान झाल्याचे दिसून येते अशी बाब नमूद आहे.

(२) सदर चौकशी अहवालात मक्ता मंजूर झाल्यानंतर निविदा प्रक्रियेतून माघार घेतलेले निविदेतील अटीनुसार काळ्या यादीत टाकणे व जादा दराने केलेल्या खरेदीची रक्कम वसूल करणे आवश्यक होते असे नमूद आहे.

(३) चौकशी अहवालानुसार जिल्हा परिषद स्तरावर चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावणू खुलासे प्राप्त झाले असून खुलासे पडताळणीची कार्यवाही सुरू आहे. दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### नागपूर येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशिन बंद पडल्याबाबत

**(५९) * २५२२७ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशिन वारंवार बंद पडून रुग्णांना त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरात पाच महिन्यात गर्भवती मातांचे मृत्यू झाल्याबाबत**

**(६०) * २६००४ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरात पाच महिन्यांमध्ये ९ गर्भवती मातांचा मृत्यू थांबविण्यासाठीच्या योजना अयशस्वी झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील वर्षी एकूण १३ मातांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन गर्भवती मातांचे मृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दिपक सावंत :** (१) एप्रिल, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीमध्ये औरंगाबाद शहरात ९ गर्भवती मातांच्या मृत्यूंच्या कारणांचे विश्लेषण केले असता सदर मृत्यू टाळण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, असे म्हणता येणार नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर माता मृत्यू प्रकरणाची जिल्हास्तरीय व विभागीयस्तरावर अन्वेषण समिती मार्फत आढावा घेण्यात आला व मृत्यूच्या कारणांचे विश्लेषण करण्यात आले. अशा प्रकारचे मृत्यू होणार नाहीत यासाठी महानगरपालिकेच्या सर्व वैद्यकीय अधिकारी च निमवैद्यकीय कर्मचारी यांना दक्ष राहण्याबाबत विभागामार्फत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयात ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत देण्यात आलेल्या फळबाग लागवडीच्या कामाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(६१) * २३९९८ श्री.नारायण राणे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ या वर्षासाठी सिंधुदुर्ग जिल्हयात तालुकानिहाय फळबाग लागवडीची कामे करण्यासाठी देण्यात आलेल्या उदिष्टाप्रमाणे पावसाळयाचा कालावधी संपला तरीही आवश्यक त्याप्रमाणावर फळझाडांची लागवड झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ या वर्षासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात तालुका निहाय फळबाग लागवडीच्या कामाचे उद्दिष्ट देण्यात आले होते व सदरहू उद्दिष्टापैकी तालुकानिहाय माहे सप्टेंबर, २०१६ अखेरपर्यंत किती फळबाग लागवडीची कामे हाती घेण्यात आली आहेत,

(३) असल्यास, उद्दिष्टाप्रमाणे जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये आवश्यक त्याप्रमाणावर फळबागाची लागवड न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) तसेच फळबाग लागवडीच्या कामाची उद्दिष्टपूर्ती न करणाऱ्या संबंधित कृषि अधिकारी, कृषि सेवक, ग्रामसेवक आदींवर जबाबदारी निश्चित करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यास ४२०० हेक्टरचे इतके उद्दिष्ट दिले आहे. त्यापैकी १९८०.२५ हेक्टर इतक्या क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली आहे. त्याबाबतचा तालुकानिहाय अहवाल पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | तालुका | उद्दिष्ट | साध्य |
|---|---|---|---|
| (१) | सावंतवाडी | ६६० | १७२.४१ |
| (२) | दोडामार्ग | २८० | १११.९० |
| (३) | वेंगुर्ला | ३१० | १९४.६४ |
| (४) | कुडाळ | ६६० | २५६.६८ |
| (५) | मालवण | ७२० | ५२३.७० |
| (६) | कणकवली | ६८० | २९०.१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| (७) | देवगड | ५८० | ३२८.९१ |
| (८) | वैभववाडी | ३१० | १०१.८६ |
| | **एकूण** | **४२००** | **१९८०.२५** |

(३) लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. तथापि, लाभार्थ्यांनी प्रत्यक्षात कामे सुरु केलेली नाहीत. कामे सुरु करण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(४) उद्दिष्टपूर्ती न करणाऱ्या उपविभागीय कृषि अधिकारी, कणकवली व संबंधित तालुका कृषि अधिकारी यांना नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**राज्यात ४ ठिकाणी तृतीय संदर्भ सेवा अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालये सुरु करण्याबाबत**

**(६२) * २४३२९ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २२८११ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या सहकार्याने राज्यात ४ ठिकाणी तृतीय संदर्भ सेवा अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालये सुरु केली जाणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अत्याधुनिक रुग्णालयांसाठी शासनाकडून नाशिकसह अमरावती, नागपूर व लातूर या चार शहरांची नावे सुचविण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालये सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.
(२) होय.
(३) केंद्र शासनाच्या सहकार्याने राज्यात तृतीय संदर्भ सेवा अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालये सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी प्रादेशिक कॅन्सर रुग्णालय, नागपूर, विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातूर रिजनल रेफरल हॉस्पीटल, नाशिक, रिजनल रेफरल हॉस्पीटल, अमरावती या ४ रुग्णालयाचे प्रस्ताव केंद्र शासनास मंजुरीस्तव पाठविण्यात आले

होते. तथापि, केंद्र शासनाच्या धोरणानुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात राष्ट्रसंत तुकडोजी प्रादेशिक कॅन्सर रुग्णालय, नागपूर, विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातूर या दोन रुग्णालयांना तृतीय संदर्भ सेवा कॅन्सर रुग्णालय म्हणून मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती या २ रुग्णालयाचे प्रस्ताव आगामी वर्षात केंद्र शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जायकवाडी तसेच इतर धरणांच्या**
**सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(६३) * २३४८९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागातील सर्वात मोठे धरण म्हणून जायकवाडी धरण ओळखले जाते, या धरणात सध्या पाण्याचा प्रचंड साठा असतानाही तेथे सुरक्षेचे कोणतेही उपाय योजलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणांच्या भिंतीवर मेंढपाळ, पर्यटक तसेच सर्व सामान्य व्यक्ती सहज ये-जा करतात, या धरणावर सुरक्षेसाठी केवळ २ खाजगी सुरक्षा रक्षक आहेत, त्यामुळे अतिवृष्टी काळात काही पर्यटकांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ, औरंगाबाद यांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कळविले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, धरणांच्या सुरक्षेबाबत शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) हे खरे नाही. धरणाच्या सुरक्षेकरीता पोलीस विभागामार्फत धरणाच्या सांडव्यावर एक चौकी असून त्याठिकाणी शस्त्रधारी पोलीसांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त जलसंपदा विभागामार्फत धरणावर ५ सुरक्षा चौक्या उभारलेल्या आहेत. त्यावर २५ सुरक्षारक्षक काम करतात. अतिवृष्टीकाळात पर्यटकाच्या मृत्यूची घटना घडलेली नाही. पोलीस स्टेशन, पैठण यांच्या अहवालानुसार दिनांक ०२/०५/२०१६ रोजी जायकवाडी धरण येथे एका इसमाच्या आकस्मिक मृत्यूची नोंद आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) धरणाच्या सुरक्षेसाठी पोलीस विभाग व जलसंपदा विभाग यांच्यामार्फत सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात बोगस डॉक्टरांनी दवाखाने उघडल्याबाबत**

**(६४) * २५०९३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात वैद्‌यकीय शिक्षणाची कोणतीही अधिकृत पदवी नसताना तसेच वैद्‌यकीय व्यवसायाचा परवाना नसताना तालुकास्तरावर अनेक बोगस डॉक्टरांनी दवाखाने उघडल्याच्या तक्रारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे स्थानिकांनी व लोकप्रतिनिधींनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तालुकास्तरीय समिती मार्फत पोलीस विभागाकडे प्राथमिक अहवाल (FIR) दाखल करण्यात आले आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य कामगार विमा योजनेचे राज्य कामगार विमा महामंडळात रुपांतर करणेबाबत**

**(६५) * २५७३४ श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्‌योगिक क्षेत्रातील राज्य कामगार विमा महामंडळाकडून चालविण्यात येणा-या राज्य कामगार विमा योजनेचे राज्य कामगार महामंडळात रुपांतर करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरूप व व्याप्ती काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना राज्यातील सर्व जिल्हयात लागू करण्यात येऊन कामगारांना या योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सद्यस्थितीत राकावि योजनेवर प्रथम शासनामार्फत संपूर्ण खर्च करण्यात येत असून झालेल्या खर्चाची राकावि महामंडळामार्फत मर्यादेत राहून नंतर प्रतिपुर्ती करण्यात येते. राज्यस्तरीय राकावि महामंडळ स्थापित झाल्यानंतर राकावि महामंडळ, नवी दिल्ली कडून आवश्यक तो निधी राज्यस्तरीय राकावि महामंडळास थेट उपलब्ध होणार असून त्यामुळे वैद्यकीय सुविधा अधिक प्रभाविपणे पुरविता येतील.

(३) राज्यस्तरीय राकावि महामंडळ स्थापन झाल्यानंतर याबाबत महामंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयामध्ये धडक सिंचन योजनेंतर्गत**
**मंजूर विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(६६) * २४७०७ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात सन २०१६ मध्ये धडक सिंचन योजनेंतर्गत ८००७ मंजूर विहिरीपैंकी ५६०७ विहिरींची कामे प्रलंबित आहेत. याकडे शासनाचे दुर्लक्ष असून निधी मिळण्यासाठी शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांकडे फेऱ्या माराव्या लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन विहिरींची कामे मुदतीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यामध्ये धडक सिंचन योजनेंतर्गत १२३१६ विहिरी मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यापैकी २७७२ विहिरी रद्द करण्यात आल्या. एकूण शिल्लक ९५४४ विहिरीपैकी ६५९० विहिरी पूर्ण झाल्या असून उर्वरित २९५४ प्रलंबित विहिरीपैकी २११८ विहिरी प्रगतीत आहेत, ७५१ लाभार्थी इच्छुक नसल्यामुळे, खारपान पट्यामुळे, कठीण खडक लागल्यामुळे, वारसाच्या वादामुळे इत्यादी अडचणीमुळे रद्द करण्यात आल्या असून अन्य ८५ विहिरी मजुरांची संख्या कमी असल्यामुळे अद्याप सुरु करण्यात आलेल्या नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये सिकलसेल आजाराच्या निदानासाठी मॉजेल मॉलिक्यूलर जेनेटीक लेबॉरेटरी स्थापन करण्याबाबत**

**(६७) * २५९६८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये सिकलसेल आजाराचे दीड लाख रुग्ण असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने येथील सिकलसेल रुग्ण संख्येला आळा घालून आजाराचे अचूक निदान करण्यासाठी विदर्भात मॉजेल मॉलिक्यूलर जेनेटीक लेबॉरेटरी स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

विदर्भातील ११ जिल्ह्यात १०,५०२ रुग्ण व १,३८,४९० वाहकांची संख्या आहे.

(२) विदर्भातील मॉजेल मॉलिक्यूलर जेनेटीक लेबॉरेटरी स्थापन करण्याबाबतची कार्यवाही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६८) * २३५८० श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २१५९८ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील महात्मा गांधी ग्रामीण हमी योजनेंतर्गत सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या कालावधीत झालेल्या २५७ कामांपैकी २१ कामांची चौकशी उपायुक्त (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समितीने केली त्यामध्ये दोषी आढळुन आलेल्या ६ कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना निलंबित केव्हा करण्यात आले आहे,

(२) असल्यास, ज्या चार अधिकारी/कर्मचाऱ्यांचे खुलासे मागविण्यात आले ते प्राप्त झालेले असल्यास, त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच सन २०१४-१५ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेल्या बहुतांश कामांचे अभिलेख ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित ग्रामपंचायतीविरूध्द शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उर्वरीत २३६ कामांची तपासणी करण्यासाठी इतर जिल्हयातील अधिकाऱ्यांची २० पथके स्थापन करण्यात आली त्या पथकांकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय, प्राप्त अहवालानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अंबाजोगाई तालुक्यामध्ये (जि.बीड) सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या कालावधीत झालेल्या एकूण २५७ कामांपैकी २१ कामांची चौकशी उपायुक्त (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली आहे. सदर चौकशीत दोषी आढळून आलेल्या ६ अधिकारी व कर्मचारी यांना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक २३ मे, २०१६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(२) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत नोटीस देऊन संबंधिताना खुलासा सादर करणेबाबत दिनांक ८ जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि सदर खुलासे अद्याप अप्राप्त असून खुलासे प्राप्त करुन घेण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

(३) सन २०१४-१५ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेल्या बहुतांशी कामांचे ग्रामसभा ठराव नसणे, त्या कामांचा वार्षिक कृती आराखड्यात समावेश नसणे, बहुतेक कामांचे रेकॉर्ड ग्रामपंचायती मध्ये उपलब्ध नसल्याचे तसेच बहुतांश ग्रामपंचायतींना कोणत्याही प्रकारची माहिती न देता कामांना तत्कालिन तहसिलदार, अंबाजोगाई यांनी परस्पर मंजूरी दिल्याचे चौकशीत आढळून आले आहे. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द निलंबन व अनुषंगिक कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २०१४-१५ व सन २०१५-१६ मधील उर्वरित २३६ कामांची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्या दिनांक २० जून, २०१६ रोजीच्या आदेशान्वये २० पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यापैकी ४ पथकांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना अहवाल सादर केला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच उर्वरीत १६ पथकांचा अहवाल प्राप्त करुन घेणेबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या स्तरावर पाठपुरावा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बालसंगोपन करणाऱ्या निवासी संस्थामधील बालकांचा निधी संस्थांना देण्याबाबत

**(६९) * २५६२९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बाल संगोपन करणाऱ्या निवासी संस्थांमधील बालकांचा निधी सन २०१० पासून प्रलंबित असल्यामुळे सकस आहाराअभावी मुलांची हालअपेष्टा झाल्याचे कॅगने (महालेखापरिक्षक) आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरचा निधी संस्थांना देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) महालेखापरिक्षक यांनी केलेल्या सर्वेक्षणामध्ये अपुरी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आल्याचे नमूद केले आहे मात्र, प्रलंबित अनुदानाअभावी मुलांची हालअपेष्टा झाल्याचे त्यांच्या अहवालामध्ये कुठेही नमूद नाही.

(२) स्वयंसेवी संस्थांच्या बालगृहचालकांनी प्रलंबित अनुदानासाठी बऱ्याचशा याचिका मा. न्यायालयात दाखल केल्या होत्या. सदर याचिकांमधील मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार स्वयंसेवी संस्थांचे पुनर्मुल्यनिर्धारण करण्याच्या सूचना शासन निर्णय क्र. रिटपी-२०१६/प्र.क्र. ४५/ का-८, दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ अन्वये देण्यात आलेल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात येत आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.